**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक,रेल्वे लाईन्स सोलापूर-413001
सामान्य प्रशासन विभाग,सो.म.पा.

---

जा.क्र./सआस/कक्ष-१/आस्था-२/विमा-४६ दि.०१/०६/२०२३

प्रति,

१)कामगार कल्याण व जनता संपर्क अधिकारी,

२)संगणक प्रोगामर

विषय :-जाहीर प्रसिध्दीकरण करणेबाबत.

सदंर्भ :-जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/विमा-४५दि.०१/०६/२०२३.

सोलापूर महानगरपालिकेमधील मा.पदाधिकारी,नगरसेवक म.न.पा आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी, रोजंदारी कर्मचारी, बदली कर्मचारी यांना व त्यांचे कुटुंबियांना सन. २०२३-२४ या वर्षाकरिता मेडिक्लेम विमा उतरविण्याबाबत ई-निविदा करण्यास माननियांनी दि.21/04/2023 रोजीने मान्यता दिलेली आहे.

माननियांचे मान्यतेनुसार विमाचे दर मागविण्याबाबतचे जाहीर प्रसिध्दीकरण सोबत जोडलेले असून ती जादा खप असणाऱ्या एक स्थानिक,एक राज्यस्तरीय (मराठी ),व एक राष्ट्रीय स्तरावरील (इंग्रजी ) वृत्तपत्रातून एक वेळ प्रसिध्द करणेत यावेत.

संगणक प्रोगामर यांनी सदर प्रंकरणी सोबत जोडलेले ई-निविदा जाहीरप्रसिध्दीकरण www.mahatenders.gov.in / www.solapurmuncipalcorporation.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेची कार्यवाही करावी.

1.06.23

(पुष्पगंधा भगत )
सहाय्यक आयुकत
सोलापूर महानगरपालिका

आवक .क्रं.281 दि. 1/6/2023
संगणक विभाग

66513/2023

**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक,रेल्वे लाईन्स सोलापूर-413001
सामान्य प्रशासन विभाग,सो.म.पा.
दुरध्वनी क्रमांक -०२१७-२७४०३००
(ई-मेल आयडी :-smccommissioner@yahoo.com)

---

जा.क्र./सआस/कक्ष-1/आस्था-2/विमा-४५ दि.०७/०६/2023

-:ई-निविदासाठी शर्ती व अटी:-

1)IRDA (Insurance **Regulatory and Development Authority**) कडे नोंदणीकृत विमा कंपनी / विमा ब्रोकर्स / विमा एजंट प्रस्तुत ई-टेंडर मध्ये सहभाग घेऊ शकतात.तसेच विमा कंपनी शासन मान्य असावी.

2)IRDA मान्यता प्राप्त **TPA** ची स्वतंत्रपणे नेमणूक केलेले असावी.

3)सर्व आजाराकरिता विमा रक्कम **र.रु.1** लाख रुपये प्रतिवर्ष (एकूण विमा रक्कमेच्या 10% रक्कम कर्मचारी हिस्सा व 90% रक्कम विमा कंपनीचा हिस्सा राहील.)

अ)1कर्मचारी +5कुटुंब सदस्य (आई,वडील,पती/पत्नी व दोन पंचवीस वर्षाखालील अविवाहित अपत्य).

ब)महिला कर्मचा-यांसाठी कर्मचारी + 5 कुटुंबसदस्य (कर्मचारी+2 पंचवीस वर्षाखालील अविवाहित अपत्य + सासू / सासरे किंवा आई / वडील यापैकी एक जोडपे याप्रमाणे )

क) जर दुस-या मातृत्व वेळी जुळी मुले जन्माला आली तर पाहिले व दुसरे यातील दोन्ही अशी एकूण तीन अपत्ये कूटुंबाच्या व्याख्येत असतील.

4)30 दिवसांचा प्रतिक्षा कालावधी (पहिले 30 दिवस ) नसावा. प्रथम दिवसापासून विमा सुरु केला पाहिजे व त्यामध्ये **कोव्हिड-19** आजाराचा समावेश केला पाहिजे.

5)कर्मचा-यांस व त्याच्या कुटुंबियास आसणा-या पूर्वीच्या आजारांसाठी ही विमा संरक्षण राहील.

6)काही कर्मचारी व त्याचे पूर्ण कुटुंबिय किंवा काही कुटुंबातील सदस्याची माहिती अनावधानाने अथवा इतर कोणत्याही कारणास्तव यादीत समाविष्ट करण्याचे राहून गेले असल्यास असे कर्मचारी व कुटुंबिय पॉलिसीमध्ये समावेश करून घेण्यात यावे यासाठी महापालिकेचे प्राधीकृत अधिकारी सदर कर्मचारी अथवा कुटंबियांच्या समावेशाबाबत लेखी पत्र देतील त्यानुसार सदरच्या नावांचा समावेश करण्यात यावा.

7)विमा संरक्षणाचे (मेडिक्लेम इन्शुरंन्ससाठीचा प्रिमियम दर ) कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय असे एकत्रित 14392 या संख्येवर **प्रति व्यक्ती (Per Life)नुसार** दर कोट करावे.सदरची संख्या ही वेळोवेळी कमी किंवा जास्त होऊ शकते.

8)प्रिमियमची रक्कम कोट करताना त्यामध्ये **GST** चा समावेश करावा.(प्रिमियमची रक्कम + **GST** सह कोट करावा.)

9)बयाणा रक्कम भरावी लागणार.

10)हॉस्पीटल मध्ये ऍडमिट होणे पूर्वीचे 30 दिवसांचा व डिस्चार्जनंतर 60 दिवसांचा खर्च समाविष्ट असावा.

11)कार्पोरेट बफर **र.रुपये 2 कोटी** राहील.सदर बफर रक्कमेचा वापर फक्त शासन निर्णय क्र.एमएजी 2005/9/प्र.क्र.1/आरोग्य3, दि.19 मार्च 2005 मध्ये समाविष्ट असलले 27 आकस्मिक आजार,5 गंभीर आजार व कोविड-19 अशा एकूण 33 आजारांसाठी राहील.तसेच शासन निर्णय 10 फेब्रुवारी 2006 मध्ये रक्ताचा कर्करोग (Blood **Cancer)** ऐवजी सर्व कर्करोग असा राहील त्यानुसार आमच्या पॉलीशीमध्ये सर्व प्रकारच्या कॅन्सरचा समावेश असावा.तो जास्तीत जास्त **रु.4** लाख इतक्या रक्कमेपर्यत अनुज्ञेय असेल. (1 **लाख** cashless + 4 **लाख** बफर याप्रमाणे रक्कम 90% टक्केपर्यत.)

12)हॉस्पीटलच्या प्रत्यक्ष खर्चाचा 90% रक्कम अनुज्ञेय राहील.उर्वरीत खर्च 10% रक्कम कर्मचा-यांचा हिस्सा राहील.

13)एखादा कर्मचा-यांचे अथवा त्यांचे कुटुंबियाचे वयाबाबत कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे वय निश्चित होत नसेल अशा केस मध्ये किमान वय 19 वर्षे व कमाल वय 59 वर्षे गृहीत धरावे.तसेच कुटुंबियाचे वय 80 वर्षे गृहित धरावे.

14)हॉस्पीटल रुम भाडे हे प्रतिदिन रुम करिता र.रु.2,500/-व आयुसीयू (ICU)विभागाकरिता र.रु.5,000/- सरसकट देण्याचे अनुज्ञेय राहील.

15)अ)मोतिबिंदू आजारांसाठी विमा सरंक्षण केवळ **र.रु.**24,000/- इतक्या मर्यादित राहील.

ब)प्रसुतिखर्चासाठी विमा संरक्षण केवळ **र.रु.**50,000/-**इतक्या** मर्यादित राहील.

16)Day **Care Procedures** समाविष्ट असावे.

17)विमा संरक्षणाच्या कालावधीनंतर मंजूर दराने विमा कंपनीच्या हॉस्पीटलच्या यादी व्यतिरिक्त हॉस्पीटल मध्ये उपचार घेतल्यामुळे झालेल्या प्रतिपूर्तीची सुविधा असावी.

18)विमा संरक्षण मेडिक्लेम साठी कॅशलेस होणेकरिता आम्ही सर्व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करत आहोत.यामुळे विमा कंपनीने कॅशलेस रुग्णालय जास्तीत जास्त वाढवावीत व त्यांची सोलापूर शहारातील संख्या किमान 25 तरी असावी.नवीन चांगल्या रुग्णालयांच्या समावेशाबाबत महानगरपालिका शिफारस करेल.

19)म.न.पा करिता आपला समन्वयक (co-ordinater) 24X7 (चौकशी मदत,समस्यांचे निराकरण करणे,बिलासंदर्भात तक्रारी इत्यादी करिता ) नेमण्यात यावा.

20) सदर शर्ती व अटीमध्ये वाढ किंवा कमी करण्याचा अधिकार **मा.आयुक्त** सो.म.पा यांना असेल.

Signed by Sheetal Teli
-ugale
Date: 31-05-2023 18:11:51

**(शीतल तेली-उगले-भा.प्र.से)**

**आयुक्त**
**सोलापूरमहानगरपालिका,सोलापूर.**

SMC-11/12/2023-SMC-GAD

023

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक,रेल्वे लाईन्स सोलापूर-413001
**सामान्य प्रशासन विभाग,सो.म.पा.**
दूरध्वनी क्रमांक -०२१७-२७४०३००.
(ई-मेल आयडी :-smccommissioner@yahoo.com)

जा.क्र./सआस/कक्ष-1/आस्था-2/विमा- ४५ दि०१/०६/2023

## -:जाहीरप्रसिध्दिकरण:-

ई-निविदा-सुचना-क्रं.2023-24

सोलापूर महानगरपालिका,सोलापूर यांचेवतीने सोलापूर महानगरपालिकेतील मा.पदाधिकारी, नगरसेवक तसेच म.न.पा मधील कार्यरत कायम/मानधन अधिकारी/कर्मचारी, व रोजंदारी कर्मचा-याकरिता एक वर्षाकरीता विमा (मेडीक्लेम) उतरविणेकामी विमा कंपनीकडून दर मागविण्यात येत आहे. सदर निविदेमध्यें निविदाधारकांनी विमा (मेडीक्लेम) बाबतचे दर देण्याचे आहे.खालील कामाची निविदा ही केवळ ई-निविदापध्दतीने सादर करावयाच्या आहे.निविदेचा विस्तृत नमुना व इतर शर्ती व अटी तसेच इतर माहिती/सुचना महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दि01/06/2023पासून पाहण्यासाठी उपलब्ध होतआहेत.

| निविदेचा तपशील | निविदाची किंमत | बयाणा रक्कम | कामाची मुदत | कोरे टेंडरची फॉर्मचीकिंमत |
|---|---|---|---|---|
| सोलापूर महानगरपालिकेतील मा.पदाधिकारी, नगरसेवक तसेच म.न.पा अस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी, मानधन व रोजंदारी कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबाचा विमा (मेडीक्लेम) उतरवणे. | र.रू.5 कोटी (अंदाजित) | र.रू. 2.5लाख | 12 महिने | र.रू. 2000 + GST सह |

**ई-निविदा-प्रसिध्दीचा-तपशिल**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | दि.01/06/2023 |
| ई-निविदा दस्तऐवजलोड प्रारंभ (Start) | दि.01/06/2023 |
| ई-निविदा दस्तऐवजडाऊन लोड समाप्त (End) | दि24/06/2023 |
| **ई- निविदापुर्व बैठक (Pre-Beed Meeting)** | दि07/06/2023, वेळ:- 11:00 AM (मा.आयुक्त यांचे बैठक कक्षामध्ये) |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात तारीख व वेळ | दि.08/06/2023 स.10.00पासून |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख व वेळ | दि26/06/2023 दु.1.00पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दि27/06/2023 दु.4.00वा. |

- कोणतेही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.आयुक्त,सो.म.पा.यांनी राखून ठेवलेला आहे.

Signed by Sheetal Teli -ugale
Date: 31-05-2023 18:08:20

(शीतल तेली-उगले-भ्रा.प्र.से)
आयुक्त
सोलापूरमहानगरपालिका,सोलापूर.